# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३१–२०१०/ दिनांक :

श्री. सिद्राम एकनाथ शिंदे ,
रा. नवाळवाडी, ता. जत, जि. सांगली — अर्जदार

**विरूध्द**

१) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,
म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,
मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली

२) कार्यकारी अभियंता
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली

३) सहाय्यक अभियंता,
म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,
उप विभागीय कार्यालय, जत, जि. सांगली — विरूध्द पक्षकार

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. बी. ए. जाधव, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. सिद्राम एकनाथ शिंदे , रा. नवाळवाडी, ता. जत, जि. सांगली यांनी मंचाकडे अ फॉर्ममध्ये दि. ११.२.२०१० ला तक्रार दाखल केली. त्यापूर्वी अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे क्ष फॉर्ममध्ये तक्रार दाखल केली आहे.

तक्रारदाराचे म्हणण्यानुसार त्यांनी वितरण कंपनीकडे घरगुती विद्युत पुरवठा मिळावा म्हणून दि. २६.९.२००७ रोजी केला व त्याचदिवशी पावती क्र. ४१६४७७२ ने रु.२५/– फी भरली. परंतु त्यांना आजतागायत चलन देण्यात आले नाही. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार ३० दिवसांचे मुदतीत म्हणजे दि. २५.१०.२००७ पर्यंत चलन मिळणे आवश्यक होते तसे न केल्याने विलंबापोटी वितरण कंपनीकडून भरपाई मिळावी अशी मागणी या तक्रारीत केली आहे. अंतर्गत कक्षाने आदेश क्र. ८०७ दि. १८.१.२०१० पारित झाला आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. ३१.३.२०१० च्या लेखी अहवालात जो मंचासमोर दि. ५.४.२०१० रोजी सुनावणीचेवेळी दाखल केला त्यात दि. ८.३.२०१० रोजी तक्रारदारास चलन देण्यात आले आहे असे म्हटले आहे. तक्रारदाराचा घरगुती वीज मागणी अर्ज दि. २६.९.२००७ रोजी मिळाल्याचे मान्य केले आहे.

सदरच्या तक्रारीच्या सुनावणीवेळी वि.प.तर्फे श्री. राजमाने, कनिष्ठ अभियंता, जत उप विभाग व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग हजर. ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे हजर. वि.प.ने ३ पोलचे सिंगल फेज कनेक्शन आहे असे सांगितले, परंतु विलंबाबाबत कुठलेही स्पष्टीकरण दिले नाही. या उलट, तक्रारदाराचे प्रतिनिधी यांनी संबंधित शाखेचे अभियंता यांच्या अकार्यक्षमतेमुळे विलंब झाला आहे असे मंचासमोर सांगितले, त्यामुळे वितरण कंपनी भरपाई देणेस जबाबदार आहे.

उभयबाजूंच्या लेखी कथनानुसार व मंचासमोर तोंडी सांगितल्याप्रमाणे तक्रारदाराने घरगुती वीज मागणीचा अर्ज दि. २६.९.२००७ रोजी केल्याचे मान्य केले आहे. तसेच रु. २५/– भरल्याबद्दल कक्षाचे आदेश झाल्यानंतर दि. ८.३.२०१० रोजी चलन देण्यात आले आहे, परंतु विलंबाबाबत वि.प.तर्फे कुठलेही स्पष्टीकरण देण्यात आले नाही.

कृती मानके विनियमातील तरतुदीचा भंग झाल्याने अधिनियम २००५ परिशिष्ट अ नुसार दि. २६.१०.२००७ ते ८.३.२०१० या कालावधीच्या १२२ आठवडे विलंबासाठी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. १२,२००/– भरपाई देणेची वि.प.ची जबाबदारी आहे व तक्रारदार ती मिळणेस हक्कदार झाला आहे. खालील प्रमाणे आदेश –

ग्राहक तक्रार निवारण मंचाचे अध्यक्षांचे पद दिनांक ३.९.२००९ ते २०.१०.२००९ व सदस्य यांचे पद दि. १.९.२००९ पासून दि. २.११.२००९ पर्यंत रिक्त राहिल्याने मंच कार्यान्वित नसल्याने १०० पेक्षा अधिक प्रकरणांची सुनावणी व निर्णय प्रलंबित राहिल्याने ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल विनियम २००५, क्र. ५:१ चे तरतुदीनुसार सदर अपिलावर असलेल्या दोन महिन्यांचे मुदतीत निर्णय करणे शक्य झाले नाही.

## आदेश

१) तक्रारदाराची तक्रार मंजूर करण्यात येत आहे.

२) वि.प.ने तक्रारदार यांस दि. २६.१०.२००७ ते ८.३.२०१० या १२२ आठवडे विलंबाच्या कालावधीसाठी प्रति आठवडा रु. १००/– या प्रमाणे रु. १२,२००/– भरपाई द्यावी.

३) सदर रक्कम दोन बिलींग सायकलमध्ये वजा करुन बाकीची रोखीने अथवा चेक/ डिमांड ड्राफ्टने तक्रारदारास देवून त्याची पावती घेण्यात यावी.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ६.४.२०१०

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. बी. ए. जाधव, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :